ISSN 2394-5303

International Peer Reviewed Multilingual Research Journal

# प्रिंटिंग एरिया

Issue-75, Vol-02, April 2021



Editor

Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

14) RURAL HEALTH STATUS OF TRIBAL WOMEN ||64
**Hiranmayee Mishra, Jajpur**

15) A Comparative Study on Cognitive errors of Individual with Obsessive-... ||67
**Dr. Kamla Tiwari & Ms Richa Ojha, Nainital, Uttarakhand**

16) COMPARATIVE STUDY OF SPORTS FACILITIES IN NORTH MAHARASHTRA ... ||74
**Prof.Dr. Namdev Phatangare, Pune**

17) IMPACTS OF FOREIGN DIRECT INVESTMENT ON INDIAN ECONOMY : AN OVERVIEW ||80
**Seema Kumari, Chapra (Bihar)**

18) जागतिकीकरणातील कविता :काही संदर्भ ||83
**प्रा.डॉ. विनोद नामदेव इंगळे, जि. बुलढाणा**

19) सायबर गुन्हे — एक सामाजिक आव्हान ||86
**डॉ. कुसुम विजयकुमार चौधरी, मुंबई**

20) संताचे ऐतिहासिक कार्य ||89
**नानासाहेब बाबुराव कदम, ता.जि. बीड**

21) गायत्री शक्तिप्रिठाच्या नवरात्री उत्सवातील मंत्रसाधना - वैज्ञानिक दृष्टी ||92
**डॉ.रजनी लुंगसे, जि.धुळे**

22) कोविड-१९ हा संसर्गजन्य आजार ||95
**प्रा.ज्योती शामराव मगर, बीड**

23) जळगाव जिल्ह्यातील कृषिविकासात जलसिंचनाची भुमिका- एक विश्लेषणात्मक अभ्यास (कालखंड ...
**डॉ. प्रा. अकोशगिर द. गोस्वीमी & अर्चना ज्ञानेश्वर पाटील, जळगांव** ||98

24) चंद्रपुर स्वातंत्र्य संग्रामात लो. टिळक आणि मा. गांधीजीचे योगदान
**प्रा. प्रफुल सुभाष रणदिवे, राजुरा** ||101

25) मराठी महानगरी कवितांची सामाजिक भूमिका
**प्रा. ममता राऊत, भंडारा** ||106

26) गडचिरोली जिल्ह्यातील माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांची अध्यापन ...
**डॉ. एस.एम.सातपुते, चंद्रपूर (म.रा.)** ||110


www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

18

# जागतिकीकरणातील कविता :काही संदर्भ

**प्रा.डॉ. विनोद नामदेव इंगळे**
ग.भि. मुरारका महाविद्यालय, शेगाव, जि. बुलढाणा

***********

बदलांच्या अपरिहार्यतेतून गवसलेलं पाथेय म्हणजे जागतिकीकरण. कमालीची गतिमानता षंढतेचे निश्वास टाकत राहते, तेव्हा, आपण सारेच आपापली प्रतिष्ठ्ा जपण्याचा शर्यतीत गुंतलेले असतो निर्विवाद. कारण प्रतिष्ठा माणसाला देते मान, सन्मान आणि नाकारतेय काय? तर जीवनाचा सच्चा भकासपणा. मानवी आयुष्य घेते कधी विकत आयुष्यालाच उरावर वजन करून. आज-काल वजनाच्या मागे माणसे बिनबोभाट लागलीत रात्रीच्या निवांत समयीही मोबाईलची घंटी झोपू देत नाही, सकाळपूर्वीच्या घमासानाला. माणसे आज कमालीची नशेबाज झालीत. त्यांचं नशापाण समग्र समाजवास्तव नागड करते. संथ -निवांत प्रवाहाला त्सुनामी यावी आणि ओळखीचाच शत्रू व्हावा हे क्रमानं ठरलेलंच. यातून वाङ्मयाचं कुठलं क्षेत्र सुटू शकत नाही. का? तर वाङ्याच्या तळाशी माणूस दडलेला असतो. आणि माणसाला हवा असतो सुखांत अनुभव. त्यासाठी कुठल्याही आवाहक शक्तीला परिणामाशिवाय तो पचवायला शिकतो.

जगण्याच्या उमेदींना हरेक काळात कवितेनं उजागर केलं आहे. जगण्याची दाहकता, सुखासिनता यांच्या सशक्त प्रेरणा कवितेला नवं रसायन पुरवित गेल्यात. कारण जगण्याच्या परिघात असणारं अगम्य शोधतांना अख्खी जिंदगी पराभूत होऊन जाते. तरीही श्वासांचा संघर्ष अविरतपणे भांडत राहतो. निपचित पडलेल्या क्षणांशी. कारण हेच क्षण नव्या आयुष्याला उभे करणारे असतात. जगणं - भोगणं आणि त्यागणं या गतिमान चक्राचे आपण सगळे पुरावेदार असतो. मानवी संसाराला आणखी काय हवे असते? त्यासाठी सगळी हयात खर्च करणारी आपण सर्वसामान्य मंडळी, म्हटलं तर मौल्यवान, म्हटलं तर मूल्यहीन. या जीवांना संस्कारित करण्याचे प्रयत्न प्रारंभापासूनच जीवांकडून जीवांसाठी होत आलेले आहेत. कारण कोणालातरी बाजूचे दावेदार व्हावेच लागते.

जागतिकीकरण आपल्या डोक्याचा अंदाज घेऊन अवतीर्ण होत राहते. होत आहे. जागतिकीकरण म्हणजे माणसाला त्याच्या असण्यासहित ओरबाडून आंतरराष्ट्रीय पेहराव करायला लावणारी सुंदर तशीच दाहक अभिव्यक्ती. जागतिकीकरणाच्या हव्या असणाऱ्या वातावरणाला आपण सहज स्वीकारत गेलोत. स्वतःच्या संवेदना आणखीन प्रगल्भ करण्याची हाव आपणास स्वस्थ बसू देत नव्हती. आपल्याला आपले समर्थ कारभारीपण टिकवायचे होते. सिद्ध करायचे होते. नव्वदोत्तर कालखंडात प्रकर्षाने आलेल्या या लोंढ्याला आपण सद्याही पोहचू शकलो नाही. तरीही त्याचे शब्द आपण बोलायला लागलो. त्यातून भांडवलाबरोबर भांडवलदारी संस्कृती विकृत अंगानं फोफायला लागली व हळूहळू माणसांचे कपडे माणसांना शहीद करू लागलेत. हे जागतिकीकरणाचे उपकारच म्हणावे लागतील. यातून आजची माझी कविता घडू लागली. तिला मर्यादा राहिली नाही.

माणसाचं मूल्य ढासळलं. ढेकळावर पाणी पडून त्यानं जागेवरच आकारहीन होऊन जावं अगदी तसंच.काळ्या मायेचे ग्लोबल तुकडे होताहेत. तिच्याबद्दलची भावना तिची उपकारिकता गुंडाळल्या गेली. जेवणावळ उठल्यावर ढुंगणाला हात पुसून घ्यावेत तसे. चलतीचे यार जन्माला यायला लागलेत. जिवंत राहणे, प्रसंगी दुसऱ्याचा जीव घेऊन ही शर्यत निर्माण झाली. झुळू-झुळू पाटाचं पाणी वाहणं बंद झालं. कुठेतरी कोरडी भाकर पालवात गुंडाळून आणणारी व वावरातच कांदा मिरची तोडून समाधानानं शिदोरी संपवणारी माय -मावली अंधुक-धुसर झाली. बोर आली विहीर गेली. विहिरीसारखी खोल माया केली. भौ गेला दादा आला. जलद गतीने पैसा कमविण्याचे मार्ग दिसायला लागले. माणसांची मन कविता झालीत. कारण नव्या संवेदनांना गाभण ठेवून काव्याचं पिल्लू हंबरवणं महत्त्वाचं वाटायला लागलं. जुन्याच भांडवलावर जगणारे बौद्धिक दिवाळखोर हास्याचे विषय व्हायला लागलेत.

नवे चेहरे नवी कविता. कविता कोणत्याही कालखंडाची मौताद नसते. कविता सुचत नाही तर भर रस्त्यात गाठते व करते नागडं प्रतिष्ठेचं जपलेलं आंगडं आपण सारेच नागडे असतो असे पाहिले तर. स्वतःला झाकण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न कमी-अधिक असतो एवढेच. पर्यायाने आपणच भांडवलदार ठरतो मग. कारण आपणच बोली बोलतो उघड्यांची व झाकलेल्यांची. कविता पारायण करीत नाही तर ती प्रश्न करते मानवी यातनांचा. वसाहतवादाला कवटाळणाऱ्या त्या मुशफिरांना. माणसांच्या वेदनांचं भांडवल करणाऱ्या प्रतिभावंतांना. ही कविता दुनियेच्या दृष्टीने कुरूप असणाऱ्या परंतु तिच्या नजरेत सुरूप असणाऱ्या हिरोंचा विचार करते. जागतिकीकरणात ही भयमुक्त व जिवंत असणाऱ्या माणसांचा ती विचार करते. माझं काय? हा प्रश्न आधीही अनुत्तरित होता व आताही.

जागतिकीकरणाच्या संवेदना जपणाऱ्या प्रतिभावंतांच्या

कविता अवतीर्ण होत आहेत. येथे प्रस्थापितांची पात्रताच मुळी जागतिकीकरणाने धुळीस मिळविली. जुने मुके झाले नवे बोलते झाले. ही जागतिकीकरणाची मिळकत. माझा धर्म गेला. रंग गेला. सखी गेली बेकी आली. भांडून जगणे आले. एक संघर्ष अव्याहतपणे चालणारा कवितेच्या संदर्भातला. जागतिकीकरण असो की आगातिकीकरण जगणे कधी संपत नाही. आजची कविताही सहजता घेऊन वावरते. जेव्हा जिव्हारी टोला बसतो तेव्हा अनैसर्गिकता गळून पडते व वर्तमान बोलू लागतो. 'केशव सखाराम देशमुख' 'द्विधा' या कवितेला जगतोय

'जगणं सोपं झालय हे खरं का?
मरण स्वस्त झालंय हे खरं का?
हे सगळं खरं असेल तर
लोक लोभाचा मांजर म्हणून का धावतात?
जगण्यासाठी सगळे मरणाचा पाठलाग का करतात?
दारावर घंटी, गेट मध्ये कुत्रा, रात्री पहारेकरी
दिवसभर सुरक्षा गार्ड
सांगा ना
आपण कुठल्या शतकात आहोत?

स्वतःला जगावेगळं केल्यानं माणसांच्या जीवनाचे संदर्भ काहीच बदलत नाही. स्पर्धा अनिवार्य आहे. माणसाच्या टिचभर पोटासाठी आभाळभर जगही पुरं पडत नाही. कारण, गरजा माणसाच्या जगण्या-मरण्याचा ताबा घेतात. गरजवंत माणूस एकाकी होतो. अनामिक भीती त्याच्या मागेमागे सुरक्षेची कवच निर्माण करते. जागतिकीकरणाने जगणे सोपे केले मरणे स्वस्त केले हा प्रश्न जगण्यासाठी मरणाशी स्पर्धा करणाऱ्यांना पाहून खराही वाटतो. कारण माणूस हा जागतिकीकरणानंतरचा आणि आधीचाही तोच ना? हा प्रश्न चिंतनाला कुठेतरी पूर्णविराम देतो. केवळ आपलं जीवन समृद्ध व्हायला पाहिजे ही मानसिक गतिमानता त्याला स्वस्थता लाभू देत नाही. धावणं निरंतर राहते त्याही पुढे जाऊन 'अनुराधा नेरुरकर' ही कवयित्री माणसांच्या ठेवणीतल्या प्रतिष्ठेवर पंजा उगारते व म्हणायला लागते 'मेनकिन' या कवितेमध्ये

मॉलच्या झगमगाटात
सगळे मेनकीन सजलेले असतात
निरनिराळ्या पेहरावात
पुतळे स्त्रियांचे, पुरुषांचे, मुलांचे
कधी दर दिवशी तर कधी आठवड्यानं
बदलत असतात त्यांचे पेहराव
माणसाचंही काय वेगळं असतंछ?
दिवसा चढवलेले मुखवट्यांची पेहराव
उतरवून
तिही अशीच शिरतात रात्री
सत्याच्या पांघरुणात.'

स्थिर झालेली कविता आपोआप काळाच्या ... होऊन जाते आणि हे गरजेचेही असते. कारण शिष्ट ... करून माणसांच्या पोटाची व्यवस्था निर्माण करता ... वेळी कुणालातरी त्यांच्या आसवांचे गाणे व्हावे लागते. ... आपल्या मधला मी आपण कधीच लपवू शकत नाही. ... मला गवसतो. व माझी होणारी घालमेल माझ्याच ... 'मी' पणाला दाखवतो. शेवटी सगळे स्वतःला उजवूनच ... असतात. नव्या झगमगाटाच्या दुनियेत. आपण उजवे ... डाव्यांचा पराभव करुच शकत नाही. अशा वेळेस पूर्णत्वाने ... उभे राहतो. 'ग्लोब मार्केट' मध्ये नव्या भावाच्या व ग्राहकांच्या ... इथे माणसांचं भावविश्व हरवून उरते केवळ विषण्णता. या ... दुसरं रूप जागतिकीकरण तर नाही? हा प्रश्न उभा राहतो.

'जग जवळबिवळ येत चाललंय आजकाल' ही कविता ... गो. कुळकर्णी सारखा कवी जगतोय त्याला दिसणारं जग असं ...

'टिचभर जाहिरातीतून टनभर उपवास करणारे
बहुराष्ट्रीय फावड्यांचे भरगच्च मुखवटे
या पार्श्वभूमीवर
जागतिकीकरणाच्या ग्रुप फोटोमध्ये
अस्तित्वाचा नागडा चेहरा न्याहळतांना
हे विश्वची माझे घर म्हणताना
दूरदेशी परागंदा झालेल्या पोह्याच्या
स्वप्नवत भेटीसाठी
सरणावर ताटकळलेल्या निद्रानाशाची म्हाताऱ्यासारखं
एकविसावं शतक भ्रमिष्ट आशेवर कटतं- बिटतं

आपली माणसं जागतिकीकरणाच्या गर्दीत हरव... असताना त्यांनी न्याहाळण्यासाठी कुठल्या नंबरचा भिंग काम ... माणसे डॉलर शोधताहेत खेटे घेताहेत खेटे देताहेत. डॉलरपोटी ... रुपया गेला तरी हरकत नाही. त्यासाठी आसवे ढाळणारी संस्कृती ... भारतीय आहे हे विसरून चालणार नाही. इथे वर्गसंघर्ष नाहीसा ... पाहतो व माणूस साक्षात उभा राहतो जाती धर्मा पलीकडचा. ... माणूस हरवला पाहून देईल काय कोणी? हा योग्य ते बक्षीसही ... जाईल. माणूस शाबूत राहिला तर, ही ठणक बलवत्तर होते. ... घुसमट ही जाती, धर्मापलीकडची आहे. माणसं नाहीशी झालेली ... वेदना 'माणसं वाढलित' ही चिंता घेऊन 'मुंबई' विश्राम प्रामाणिक ... कविता घेऊन येते.

'माणसांच्या लाटा

बसमधील, लोकलमधील, प्लॅटफॉर्मवरील, दादरातील
रस्त्यातील, हॉस्पिटलमधील, चित्रपट गृहातील, मंदिरातील,
समशानातील, हॉटेल्स, बार, रेस्टॉरंटमधील,
सायबर कॅफेती, वडापावच्या गाडीभोवती इ.
या लाटात मीही असे
त्या गर्दीतून माझ्याकडे येई माझेच
एक चिरंतन सत्य
मी क्षुद्र आहे एक थेंबासारखा.'

माणूस ढासळतोय या साऱ्या विश्वाचे नामकरण तू केलेस हा कवीचा बुलंद स्वर माणसाच्या मूल्यत्वाचा विचार करतो. माणूस हेच अंतिम सत्य आहे. माणूस जगला पाहिजे हा जागतिकीकरणातही मानवता जपणाऱ्यांचा सूर आहे. जागतिकीकरण एखाद्या अरिष्टासारखं कोसळताना आपण सावरलं पाहिजे ही भूमिका जोर धरत जातेय. माणसाच्या क्षुद्रत्वाची सूचना मर्ढेकरही करून देतात. स्वतः आपल्याला चक्राला बांधून धावणारी माणसे क्षुद्रवत वावरताहेत. माणसाचं नैसर्गिक जीवन शोधतांना हताश होणारा कवी दुःखावेगाने आपली दृष्टी जमिनीकडे ठेवून जड अंतःकरणाने चालू लागतो. 'दुभाजक' या कवितेत अनिल जवंजाळ हा कवी म्हणतो,

'गावाच्या पाऊलवाटेवरून शहराकडे निघतांना
विस्तारत गेली पाऊलवाट
शहर कडेला स्पर्श होताना
वाटलं, रुंदावत गेलेल्या रस्त्यासारखेच असावे
शहरातील लोक
घरासारखे स्वच्छ चकचकीत
दिस मास वर्ष गेले
भेटलीच नाहीत
काळजातील ऐसपैस माणसं.'

जागतिकीकरणाला विरोध नाहीच. परंतु रुंद रस्त्यासारखी शहरी माणसांचं अरुंद होणं भयावह आहे. जो-तो आपल्या बिळात जगाची चिंता वाहतो. आपण सताड डोळे उघडे ठेवून पाहण्यापलिकडे काहीच करू शकत नाही. कारण नाकारणारे अप्रतिष्ठित समजले जाऊ लागतात. जास्तीत जास्त प्रतिष्ठेत जगण्याचे धाडस आपल्या दुबळेपणाला जन्माला घालते. जागतिकीकरणात शोषकांचे चेहरे ओळखणे आणखीन कठीण झाले आहे. माणसांमधली आपुलकी गेली. मला ही पोट आहे ही नवी भाषा जन्माला आली. हातावर आपलं, पर्यायाने भुकेकंगालाचं पोट तोलून धरणारी 'कॉमन मॅन' ही सुनील अभिमान अवचार या प्रतिभावंतांची कविता समोर येते. तसं त्याच्यातलं आणि आपल्यातलं कॉमन काय? कारण भूक ही सनातन आहे.

भुकेपोटीच गर्भ राहतो जगाला व भुकेपोटीच बलून होतो दुनिया
'कॉमन मॅन
तासन्तास लाईनमध्ये उभा
कधी सार्वजनिक संडासाच्या दारासमोर
कधी लोकल ट्रेनच्या तिकिटासाठी
कधी रेशनसाठी, कधी मतदानासाठी
कधी जन्माच्या दाखल्यासाठी कचेरीत
पण तो नसतोच कधी
राष्ट्रीय पक्षांच्या जाहीरनाम्यात!

कॉमन मॅनचे कॉमनचं जग. हे जवळ येऊन तो गाडल्या जात आहे. त्याच्या पाठीमागेही कोणी नाही मस्त कलंदराचं जीवन जगणारा कॉमन मॅन जगायला लागला तर जगातील सुखासीन वारे आपल्याकडे फिरण्याची हिंमतही तो ठेवतो. तरीही कपड्यांची आरास मांडून परक्या दुखण्याची कळ दाबता येत नाही. आजही भाकरीला महाग झालेला कॉमन मॅन दिसतो आहे गटारातील उपसलेल्या घाणीत. तो मारतो देशी. विदेशीची स्वप्ने पाहून. कॉमन मॅनला जन्माला घालण्यासाठी. गांडीला लंगोटी बांधून पोटाची भोकं बुजविता येत नाही. तरीही तो लावतो जोर का? तर स्पीड मेंटेन करता यावा म्हणून, फिगर मेंटेन करणाऱ्या ग्लोब पोरीसारखा. वेगात भावणाऱ्या गाडीच्या स्वच्छ चक्क्याकडे पाहता -पाहता रस्त्यानं का मलूल व्हावं? असं चंतकोर उरलेलं शिल्लक आयुष्य आतडे तोड करणार मन, स्पष्ट दगडांशी झुंजण्यात उभारून यावं, तसं माणसांच्या उंचीला ठेंगणं करून जाणारं. नव्या जगाच्या, माणसाच्या घराचं टॉवर उचे लोक संपन्न करणारे खेडूत बापे, शरीराच्या देखभालीसाठी हातवारे नाचणारे भाडोत्री महाराज, बधिरीकरणासाठी कॉमन मॅनला आजही मोजावे लागतात छदाम!

तर समाजाच्या दुसऱ्या टोकाला अस्तित्वासाठी चाललेला संघर्ष उभा राहतो. अलीकडे वाचण्याची भाषा केली तर टिकणे याची शक्यता वर्तविता येते. नाहीतर, आपण कुठे असतो हयात माणसांच्या गर्दीमध्ये 'प्रज्ञा दया पवार' 'स्त्री' या संकल्पनेला जपू इच्छितात, परंतु हे वातावरण जेव्हा त्यांनी रास देत नाही तेव्हा त्यांचे विव्हळणे शिल्लक राहते. नारायण सुर्वे, नारायण कुळकर्णी कवठेकर ही मंडळीही स्त्रीच्याभविष्याचा विचारच पेरून जातात. 'शो मस्ट गो ऑन' ही प्रज्ञा दया पवार यांची कविता त्या अंगानं पाहता येईल.

'म्हणजे या अशा नैसर्गिक (!) वातावरणातही
नैसर्गिक वाटत नाही मला
सेंट्रलाईज्ड एसीत घाम फुटतोय
सतत माझ्या तळव्यांना
आंतरराष्ट्रीय मिनरल वाटरनेही

शमत नाहीये
माझ्या घशाला पडलेला शोष
मुलायम पांढऱ्याशुभ्र बिछान्यात
तळमळते आहे मी
या कुशीवरून त्या कुशीवर
आठवतच नाही मला
कुठं विसरून आले मी
माझं लाईफ जॅकेट

नारायण सुर्वे भविष्यातील स्त्रीला उभं करतात. 'जेव्हा मी या अस्तित्वाच्या पोकळीत नसेल तेव्हा तू एक कर, मला स्मरून अथवा विस्मरून नवे घर कर, नवा हिरवा चुडा भर' घरातून केवळ जगाला न्याहाळणारी स्त्री विश्वाला कवेत घेऊ लागली. इथे ती अबला नाही परंतु तिथे तिला तिचा एकटेपणा उध्वस्त करतोय. प्रगती कोणती? आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक की मानसिक हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. याचे उत्तर कवयित्री शोधू पाहते. शेवटी सदानंद देशमुख एक निर्धारच करतात जागतिकरणाच्या सुंदर भासणाऱ्या वातावरणात 'शोध' मधून

केमिकल पेस्ट टाकून
अकाली पिकलेल्या
तुझ्या  परडीतल्या ढीगभर फळांपेक्षा
माझ्या तुटक्या फांदीवर लटकणारी
कतरांडच मधुर वाटते मला.
आणि तुला म्हणून सांगतो
माझे पंख शाबूत आहेत तोपर्यंत
मी शोध घेतच राहणार आहे पुन्हा पुन्हा
या शिवारातला'

जागतिकीकरणाला पर्यायाने भांडवलवादाला किती नाकारलं म्हणजे आपण परंपरेचे पाईक होऊ, किती स्वीकारलं पाहिजे मोठे होऊ यापेक्षा जगण्याच्या प्रेरक शक्तीला इमान राखलं म्हणजे जागतिकीकरणात सामान्य माणूस जिवंत राहू शकतो. तसा सामान्यच प्रत्येक काळाचं अपत्य असतो. जागतिकीकरणाची धग त्यालाच लागते व त्याला ती पचितवताही येते. तो त्याचा जागता असतो. म्हणूनच तो कधी कादंबरीतून, कधी कथेतून तर कधी कवितेतून अवतीर्ण होत असतो.

**संदर्भ**


१. निवडक समीक्षा, रा.ग. जाधव

२. साहित्य समाज आणि परिवर्तन, वासुदेव मुलाटे

३. जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य, संपादक डॉ.नागनाथ कोतापल्ले, प्रा. दत्ता भगत


**19**

# सायबर गुन्हे — एक सामाजिक आव्हान


**डॉ. कुसुम विजयकुमार चौधरी**

चेंबूर सर्वकष शिक्षणशास्त्र महाविदयालय, चेंबूर, मुंबई


**********

**प्रस्तावना :**

आजच्या युगात इंटरनेट हे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. दैनंदिन जीवनातले आर्थिक व्यवहार, बँकिंग, व्यावसायिक, शैक्षणिक, वैदयकिय o जनसंपर्क यासारखे बरेच व्यवहार आजकाल इंटरनेटच्या माध्यमातून पार पाडले जातात. कोविड सदृश्य परिस्थितीमध्ये हे प्रमाण १६ः वाढले आहे. इंटरनेटच्या माध्यमाने मानवी जीवन सुलभ झाले आहे. हे जितके खरे तितके च त्याच्या वापरा बाबत असलेल्या अपुऱ्या माहितीने ते धोक्यातही आहे. सायबर गुन्हेगार याच उणिवांचा फायदा उठवून इतरांचे आर्थिक व सामाजिक नुकसान करतात. त्यामुळे इंटरनेटचा वापर सुरक्षितरित्या करणे हे काळाची गरज आहे. याचे उत्तम उदाहरण इंटरनेट फोन आणि सॅटेलाईट फोनचा अवैधरित्या वापर करून जगातील अनेक सुरक्षा यंत्रांना कोणताही सुगावा न लागता '२६/११' सारखा मोठा दहशतवादी हल्ला कसा केला जाऊ शकतोए हे अतिरेक्यांनी सर्व जगाला दाखवून दिले.

**सायबर गुन्हे म्हणजे काय :—**

इंटरनेटच्या माध्यमातून सायबर स्पेसमध्ये जे काही गुन्हे केले जातात त्यांना सायबर गुन्हे असे म्हणतात. एखादयाच्या संगणकावरून खाजगी माहिती घणे किंवा चोरणे आणि त्या माहितीचा वापर चुकीच्या पध्दतीने करणे /वापरणे म्हणजेच सायबर गुन्हा असे म्हणता येईल. जर त्यात सायबर क्राईम मोठया प्रमाणात झाला तर त्याला सायबर दहशत म्हणतात.

**सायबर सुरक्षेचे महत्व :—** अधिक हुशार लोक किंवा गुन्हेगार इंटरनेचा चुकीचा वापर करतात. हे लोक

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
International Multilingual Research Journal
PRINTING AREA
ISSN-2394-5303

ISSN 2394-5303

Peer Reviewed International Multilingual Research Journal

# Printing@rea

Issue-76, Vol-02, May 2021




Editor
Dr.Bapu G.Gholap

27) भटक्या विमुक्त जमातींच्या आत्मकथनांचे मराठी साहित्यातील योगदान
**श्री. राजकुमार बबन शेलार & डॉ. महादेव पंढरीनाथ वाळुंज, जि. पुणे** ||130

28) वर्तमानाचे दाहक संदर्भ : 'तुम्ही कोणत्या मार्गावर?'
**प्रा.डॉ. विनोद नामदेव इंगळे, जि. बुलडाणा** ||132

29) भारतीय अर्थव्यवस्थेत लघु उद्योगाची भूमिका व महत्व
**प्रा. प्रशांत जगदिश वाल्देव, भंडारा** ||136

30) भारतातील परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक प्रवृत्ती : एक दृष्टिक्षेप
**डॉ. उदय मारुती लोखंडे, सातारा** ||139

31) मराठवाड्यातील लोकसंख्येच्या लिंगगुणोत्तर वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास
**प्रा.डॉ. सुधाकर विठ्ठलराव वनवे, ता.जि. बीड** ||142

32) उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमतेचा तुलनात्मक अभ्यास
**श्रीमती सिंधू विश्वंभर झोडपे, औरंगाबाद** ||144

33) गाँधी दर्शन में 'स्वराज'
**डॉ. चित्रा आम्रवंशी, भोपाल (म.प्र.)** ||146

34) धूमिल की 'पटकथा' में चित्रित राजनीति
**अनिशा, गुरूग्राम** ||151

35) `हवा सी बेचैन युवतियां` में स्त्री चेतना
**मनिषा श्रीराम चव्हाण, औरंगाबाद** ||157

36) हिन्दी गजल में फिक्र और जिक्र
**डा. जियाउर रहमान जाफरी, गया, बिहार** ||160

37) वैश्वीकरण में भाषा की महत्ता
**डॉ. आकांक्षा जैन, इंदौर (म.प्र.)** ||162

38) भारतीय राजनीति में महिलाओं की भूमिका
**डॉ. निखत खान, जिला बालाघाट, म.प्र.** ||165

39) झारखण्ड के आदिवासीय जीवन शैली में आधुनिकता का समावेश
**कीर्ति मिंज, राँची** ||167

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

५) भटक्या विमुक्त जमातींवर गुन्हेगारीचा शिक्का बसल्यामुळे या आत्मकथनांतून भूक, उपासमार, दारिद्र्य, बेरोजगारीचा प्रश्न तीव्रपणे समोर आला आहे.

६) भटक्या विमुक्त जमातींच्या आत्मकथनात आलेल्या वेगवेगळ्या बोलीतील शब्द संपदेमुळे मराठी भाषा समृद्ध झाली आहे.

७) भटक्या विमुक्त जमातींची आत्मकथने त्या जाती जमातींच्या माणसांची जीवनशैली त्यांचा समाज त्यांच्या व्यथा, वेदना समजून घेण्याच्या दृष्टीने आणि प्रस्थापित समाजाला सामाजिक आणि वाङ्मयीन दस्तऐवज ठरावा एवढ्या मौलिकतीची झाली आहेत.

८) भटक्या विमुक्त जमातींच्या आत्मकथनांमुळे भटक्या विमुक्तांच्या वाङ्मय चळवळीला बळ मिळाले आहे. भटक्या विमुक्तांच्या वाङ्मयात या आत्मकथनामुळे मौलिक भर पडली आहे.

९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीकारी विचारांची प्रेरणा जशी दलित आत्मकथनांच्या मुळाशी आहे. तीच प्रेरणा भटक्या विमुक्त जमातींच्या आत्मकथनांच्या मुळाशी आहे. प्रत्येक आत्मकथनकाराची व्यक्तीगत लेखनप्रेरणा वेगळी असली तरी त्यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो.

**संदर्भग्रथ :**

१) भालचंद्र फडके, दलित साहित्य वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन प्रथम आवृत्ती १९७७

२) डॉ. रविंद्र केदार, डॉ. गोपाळ ढोले, दलित आत्मकथने : चिंतन आणि चर्चा, अथर्व पब्लिकेशन, धुळे, प्रथमावृत्ती २०१३, पृ. ५९

३) चव्हाण प्रकाश 'उदई' ग्रंथाली प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २०१०, पृ. ५

४) चव्हाण किसन, 'आंदकोळ' ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती २०१५, पृ. ८

५) पवार अशोक, 'बिराड' मनोविकास प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००१, पृ. २

❑❑❑

**28**

# वर्तमानाचे दाहक संदर्भ : 'तुम्ही कोणत्या मार्गावर?'

**प्रा.डॉ. विनोद नामदेव इंगळे**
ग.भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय, शेगांव, जि. बुलडाणा

***********

'कविता' ही मानवी संवेदनांची अभिव्यक्ती असते. असे ढोबळ मानाने आपण म्हणत आलेलो असलो तरी, ती कोणत्या अवस्थांना घेऊन प्रसव वेदना देते हे लक्षात घेणे एक अभ्यासक या नात्याने अगत्याचे असणे म्हणजे, कवितेची परिभाषा समजणे होय. कविची कविता ही त्या–त्या काळाचे अपत्य असते असे म्हटले तर ते बाळबोध वाटू नये. कारण ही तिच्या अवस्थांतरणाच्या प्रकटीकरणाची सुपिक जमीनच असते.

याच जमिनीमध्ये ते–ते सर्व उगवणार असते. उगवत असते, ज्याची भाकीतं कवी जोखत असतो. आणि म्हणूनच तर तो वेगळा असतो इतरांपेक्षा. सामाजिक पर्यावरण हे व्यापक आहे. या व्यापकतेच्या परिघातला एक अल्पसा भाग म्हणजे माणूस आहे. या अल्पशा भागावर जरी कविता येऊन थांबली तरी, त्याचा विस्तार करण्याची ताकतही ती ठेवते. कारण हा माणूसच तिच्या विचार चक्राची गती निश्चित करणारा असतो.

त्यामुळे कवी त्यामध्ये गुंतत जातो. तो त्याच्या अभिव्यक्तीचा एक भाग होतो. त्याच्या सर्व असण्या–नसण्याच्या शक्यतांचा तो साक्षीदार होतो. तो स्वशी बोलता–बोलता केव्हा वैयक्तिक कोषातून सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी होते हे त्यालाही कळत नाही. परंतु त्याचे व्यक्त होणे हे मानवी समुहाला त्याच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारे असते हे महत्वाचे. या समग्रतेचे आकलन आपल्या विचार प्रतिभेच्या अंगाने डॉ. रामदास इंगळे यांनी आपल्या

'तुम्ही कोणत्या मार्गावर?' या पहिल्या काव्यसंग्रहाच्या रूपाने साहित्य विश्वामध्ये मांडले आहे. त्यांच्या या कविता वाचकांच्या आकलन कक्षा आणखी विस्तारीत करण्याचे सामर्थ्य ठेवतात हे विशेष. 'तुम्ही कोणत्या मार्गावर?' हा काव्यसंग्रह एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर दस्तक देतो. या कविता संग्रहामध्ये एकूण पंचावन्न कविता आहेत. या कवितांचे महत्वाचे वैशिष्ट्य हे की, त्या विषयाच्या वेगळेपणाला जपतात. एखादा विषय हा पुन्हा एक नव्या कवितेचा चेहरा घेऊन येत असला तरी, त्याची ठेवण वेगळी आहे हे विसरता येत नाही. याची जाणीव या काव्यसंग्रहाच्या मुखपश्ष्ठाला पाहताचक्षणी होतेरंगाच्या कुंचल्यामधून ते आपल्याशी संवाद साधते नव्वदोत्तरी कालखंड हा अनेकार्याने महत्त्वपूर्ण आहे. या कालखंडाने माणसामाणसातील अंतर जसे कमी केले, तसेच त्याच्या भावविश्वामध्ये अतीव अशी पोकळीही निर्माण केली आहे. ही पोकळी मग नातेबंधाची असेल, अर्थवत्तेची असेल, सांस्कृतिक अथवा सामाजिक परिमाणाची असेल. एक अभ्यासक या नात्याने आपण कुठल्या पोकळीशी संधान साधतो हे महत्वाचे. त्याच पर्यावरणाचा एक महत्वाचा भाग म्हणजे शेतकरी. 'शेतकरी' या विषयाने एकप्रकारे समग्र साहित्य प्रवाहाला समृध्द केले. अनेकांना प्रतिष्ठेच्या वाटेवर आणून सोडले. प्रतिष्ठीत केले. प्रतिष्ठा पावलेल्यांनी शेतकऱ्याचे स्वार्थाच्या अंगाने केवळ शोषण केले की, त्यांच्या व्यथा वेदनांना जगाच्या समोर मांडून दाद मागितली की, ठणकावून सांगितले. हा खरेतर एक न सुटलेला सवाल आहे. परंतु असे असले तरी, तो साहित्यातून आजपर्यंत अव्याहत येत राहिला आहे. या अंगाने शेतकऱ्यांच्या जगण्या—मरण्याचा विचार कवी रामदास इंगळे करीत नाहीत तर, त्यांचे भावविश्व हे माझे आहे हा जिव्हाळा त्यांची कविता व्यक्त करीत आलेली आहे. हे जे आपलेपण त्यांच्या कवितेतून आपणास पाहायला मिळते ते अस्सल नैसर्गिक आहे. 'आमची माती आमची माणसे' ही कविता त्याचे बोलके रूप आहे.

**'चला बापुच्या खेड्याकडे**
**अहिंसेचे मुके सापळे**
**आत्महत्येची बाब कोणी ना रडे**
**भकास झाले भारताचे खेडे' पृ. २४**
**किंवा**
**'देश विकास योजना**
**शेतकऱ्याची ग्राम दैना**
**विज्ञानाच्या पावलावर**
**चंगळवादी नाचे मैना.' पृ. ५९**

'श्रमिक दाता' किंबहुना 'आमची माती आमची माणसे' ही कविता असेल, दोन्हीही शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेचा विचार करतात. हे खरे आहे की, हा विषय सातत्याने तुकोबांच्या कालखंडापासून समाजमनाला विचारप्रवृत्त करीत आलेला आहे कधी निसर्गाच्या मारामुळे तर कधी मानवनिर्मित शोषण व्यु्व्हारामुळे. त्यात भरडल्या गेला मात्र तो शेतकरीच. याचीच खंत कवी या कवितेमध्ये व्यक्त करतो आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये अनेक अनुत्तरीत प्रश्नांना तोंडे फुटतील असे वाटले होते परंतु ते क्षण आजपावेतोही अनुभवयास आले नाही. हा एकप्रकारे या समाज व्यवस्थेचा पराभव आहे. इथल्या स्वार्थकेंद्रित मनोवृत्तीचा षंढपणा आहे. कारण ही व्यवस्था मग ती सामाजिक असो अथवा राजकीय ती शेतकऱ्याला स्वलाभासाठी भांडवलच समजत आलेली आहे. त्या भांडवलाचा वापर करण्याचा अधिकारच जणू आपल्याला जन्मताच प्राप्त झालेला आहे. हा जो अविर्भाव आहे त्याने शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने विचार करायला एक जागा उभी केली. परंतु तिच्या जवळपास शेतकऱ्याची किती मुलं पोहचलीत हा सुध्दा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. प्रश्न मांडून जर आपल्या यातना कमी होण्याचे नाव घेणार नसतील तर, आपल्याला कुठेतरी आपल्या भूमिकेला ताऊन—सुलाखून घेतलं पाहिजे. आपल्या भूमिकेला तपासता आलं पाहिजे. हा प्रश्न कवी इथे उपस्थित करतो. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. हे तर आहेच परंतु तो एक साक्षात माणूस आहे आपल्यासारखा. त्याचा संसार आहे. त्याचा गोतावळा आहे.

त्याच्या काही गरजा आहेत. जबाबदाऱ्या आहेत. त्यांना एक जबाबदार प्रमुख म्हणून त्याला पूर्ण करायचे आहे. हे इथल्या शासनव्यवस्थेला समजण गरजेचं आहे. केवळ मतांसाठी त्यांचा गवगवा करून,

राजा म्हणून त्याची अवहेलना थांबवणे गरजेचे आहेही तीव्र भावना कवीची आहे. कवी हा स्वत: खेड्याशी नाळ जपून आहे. त्यामुळे तिथे व्यक्त होणारे शब्द चिंतनगर्भ आहेत.

या समग्र समाजाला सातत्याने अंध:काराच्या गर्तेतून बाहेर काढण्याचं काम या समाजातील थोरामोठ्यांनी केलं आहे. हे विसरता येणार नाही. त्यांचा संघर्ष हा मानवतेचा होता. मानव कल्याणाचा होता. मानवमुक्तीचा होता. माणसासाठीचा एक माणूस म्हणून होता. समाजातील अन्यायी मानसिकता हा त्यांच्या संघर्षाचा केंद्रबिंदू होता. या व्यवस्थेशी ते लढत राहिले. थेट तुकोबांपासून ते फुले शाहू आंबेडकरांपर्यंतची ही परंपरा आहे. याही पुढे ती आपणास पाहता येते माणसा—माणसांत जाणवणारा जो भेद आहे त्याची सुध्दा एक परंपरा निर्माण केलेली आहे. याची जाणीव कवीच्या कवितेमधून होत जाते. आपल्या 'मानवतेचे दिवे' आणि 'मानवता' या दोन कवितेमध्ये समाजमनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न एकविसाव्या शतकात ते करतात. वातावरण किती निवळले की आणखी काळवंडले याचे चिंतन ते मांडतात.

**नर उध्दार ध्यास, परिवर्तना गती**
**जन गातो अखंड, नव क्रांती ज्योती'**
**किंवा**
**'ज्योती सावित्री, गुरू समाजदात्री**
**आंबेडकर शिक्षणात, माणूस पाही.'**

समानतेचा एक सशक्त धागा गुंफत दुभंगलेली माणसांची मने पुन्हा आत्मियतेने सांधण्याचा प्रयत्न याच समाजात झालेला आहे. सामाजिक दिवाळखोरी थांबवायची असेल तर, प्रत्येकाने स्वत:च्या प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पनांमधून बाहेर पडणे गरजेचे आहे. इथे कुणीही स्वत:ला थोर आणि लहान समजण्याची आवश्यकता नाही. आपण सारे एकाच वाटेचे प्रवासी आहोत. याची जाणीव गाडगेबाबांनी सातत्याने आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून करून दिलेली आहे. माणूस बदलला पाहिजे असे म्हणण्यापेक्षा त्याने डोळसपणाने आपला सभोवताल धुंडाळला पाहिजे तेव्हाच वास्तवाचा खरा अनुभव तो घेऊ शकेल. तेव्हाच तो खरा माणूस होऊ शकेल. ही थोर शिकवण कविची कविता देत जाते कविता ही सभोवतालावर भाष्य करते. व ढोंग करणाऱ्यांच्या कॉलरला सरळ हात घालण्याचं धाडसही दाखवते. असं जरी असलं तरी, तिचं म्हणून एक भावविश्व असते. अशावेळेस ती जनभानाचा विचारच करीत नाही. आपलं तारूण्य, त्यातील गुलाबी क्षण, बहरलेलं निसर्ग सौंदर्य या सर्वांचा विचार तिला करावासा वाटतो.

त्यामुळे कविने केवळ वस्तुनिष्ट स्वरूपाने व्यक्त व्हावं हा विचार करणं गैर असतो. तो काहीकाळ आत्मनिष्ठ होऊन व्यक्त होतो. समोर व्यक्त होणारी त्याची भावना ही त्याची आत्मनिष्ठा समजायची. या प्रत्ययाच्या अनेक कविता या संग्रहामध्ये शोधायचं म्हटल्यास सापडतात. त्यातीलच 'कॉलेजचं वारं' ही कविता.

'कॉलेजचे खुले महाव्दार, उधळल्या घोड्यावर स्वार
तारूण्य स्वप्नाचे विहार, जीवनात आव्हान स्विकार.'
किंवा
'औत्सुक्याची आसुशी गुलाबकळ्यांना
चाफा पाहून, कळ्या मोहरल्या आता.'

'प्रेम' ही एक नैसर्गिक भावना आहे. यावर कवीचा विश्वास आहे. त्या भावनेच्या तोलामोलाचा विचार करणं ही जी उदात्तता आहे याला आपण जपलं पाहिजे ही अपेक्षा कवी इथे करतो. प्रेम हे ध्येयप्रवण असणं गरजेचं आहे. कर्तृत्वाची किनार त्याला असावी. शुध्द भोगवादाला कवी कडाडून विरोध करतो. कुसुमाग्रजांनी ही प्रेमाची उदात्तता आपल्या कवितेत मांडली आहे. अधोरेखित केली आहे. असे असले तरी, ही कविता केवळ एकच—एक विषय उत्कटतेने विचारते, तर असे म्हणायला वाव मिळत नाही. तिचे विश्व अफाट आहे. त्याची प्रचिती नव्वदोत्तरी कवितेमध्ये आपणास जशी येते, अगदी तशीच कवी रामदास इंगळे यांच्या कवितेतूनही येते हे विशेष. ते आपल्या 'खरा आंबेडकरवादी कोण' या कवितेमध्ये म्हणतात की,

''शिका, संघटित व्हा, करा संघर्ष ।''
बदलला समाज मनात हर्ष
अन्वयार्थ निघतो का नवा?
स्वत:साठी शिकलो, स्वार्थापोटी विकलो

आलो एकत्र जातीचे दोन, आपसात भांडू लागलो.'

हा अंतर्मुख करणारा प्रश्न नेहमीसाठी चिंतनाचा राहिलेला आहे. बाबासाहेबांना अभिप्रेत असणारा माणूस आज आपणास दाखवता येतो का? खरे तर प्रश्नानेच या कवितेची सुरूवात कवी करतो. या समाजातील अन्यायाच्या चक्रात सापडलेला माणूस अन्यायमुक्त झाला पाहिजे. शोषणमुक्त झाला पाहिजे व स्वत:च्या पलिकडचं जग त्याच्या आस्थेचा विषय झाला पाहिजे. या स्वप्नाचं आज काय झालं? हा प्रश्न कवी विचारतो कवीची निरिक्षणाची सूक्ष्मवृत्ती त्यांच्या प्रत्येक कवितेगणिक आणखी तीव्र होत जाते. त्यांचे समाजभान चौफेर आहे. त्यांची कविता ही त्यांची स्वत:ची आहे तिच्यामध्ये अनुकरणाच्या अंगाने फेरफार ते करीत नाहीत त्यामुळे जो नैसर्गिक साधेपणा असतो त्याची प्रचिती येत जाते. सामाजिक आदर्शांवर ते जेव्हा येऊन पोहचतात, तेव्हा त्यांना आणि त्यांच्या माध्यमातून आपणासही काही प्रश्न पडतात. ज्यांचे उत्तर आपणांस एक सामाजिक घटक म्हणून द्यावेच लागते. सामाजिक सौंदर्याचा मूलस्त्रोत असणारा आदर्शवाद कालबाह्य होतोय की काय? याच्या संवेदना कविला होत जातात व त्या शब्दरूप घेतात. ते आपल्या 'आदर्श' या कवितेव्दारे,

'लोकशाहीला सत्तेने लुटले,<br>धर्म धुक्याने राष्ट्रीयत्वच झाकले<br>इतिहास देईल आदर्श दाखले,<br>महापुरूषांची दृष्टी करेल भले.'

अगदी तुकोबांपासून ते बाबासाहेबांच्या संविधानापर्यंतचा एक सलग कालखंड उभा करण्यात कवी यशस्वी होतात. आपण कोणत्या देशात, समाजात राहतो? त्याच का ज्या देशाला, समाजाला ज्या महामानवांनी संतांनी सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून एकसूत्रात ओवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या आदर्श जीवनाच्या संस्कारांना आपण विसरून केवळ क्षणैक चंगळवादाच्या नादात आपण अडकलो हे आणि असे अनेक प्रश्न कवी करतो. हे वास्तव आहे. याला कुणीही नाकारू शकत नाही. याची जाणीव व्यक्तिना होत नाही असे नाही. परंतु आपल्या कुटुंबाच्या पलिकडचा विचारच कुणी करायला धजत नाही. खरी अडचण ही आहे. याचा जबरदस्त मनस्ताप कवीला आहे. आपण कुठेतरी 'एकसंघ समाज' हा विचार करता झालो पाहिजे ही वर्तमानाची आवश्यकता कवी विशद करीत जातो.

या काव्यसंग्रहातील इतर कवितांचा विचार करीत असतांना अनेक ज्वलंत प्रश्नांना कवी उभा करतो. त्यामध्ये समाजवाद, सांस्कृतिक पडझड, आर्थिक विवंचना, परिवर्तनाची दस्तक, सुधारणावाद, बेकारी, राजकीय स्वार्थलोलुपता, पर्यावरणाच्या सौंदर्याचा मानवी मनावर उमटणारा ठसा, ध्येयवाद, निराशा, पिढ्यांचा संघर्ष यांचा समावेश करावा लागतो. शेवटी काही ओळींमध्ये कवी व्यक्त होतो.

'पुढे पुढे टाकलेल्या प्रत्येक,<br>पावलात विश्वास पेरत गेलो,<br>जमिनीवरच पाय ठेऊन, आकाशात झेप घेत गेलो.'

कवीची कविता ही कशी गतीमान, पोक्त आणि समृध्द होत गेली त्याचे बोलके रूप ह्या ओळी ठरतात. हे नव्वदोत्तरी कालखंडाचे एक वेगळेपण आहे. इतर कवींसारखे त्याच–त्या विषयावर ते बोट न ठेवता नवतेचा ध्यास त्यांच्यासाठी महत्वाचा ठरतो आणि तेच त्यांचं सामर्थ्यही ठरते.

❑❑❑